# इतिहास–राज्यशास्त्र

## उत्तरे : सराव कृतिपत्रिका 5 वी

**प्र. 1. (अ)**

(1) भारतातील ‘बेंगॉल गॅझेट’ हे पहिले इंग्रजी वर्तमानपत्र जेम्स ऑगस्टस हिकी यांनी सुरू केले.

(2) ‘मराठी रंगभूमीचे जनक’ म्हणून विष्णुदास भावे यांना ओळखले जाते.

(3) भारतातील पहिले सरकारी अभिलेखागार इसवी सन १८९१ मध्ये ‘इंपिरियल रेकॉर्ड डिपार्टमेंट’ या नावाने कोलकाता येथे स्थापन झाले.

**प्र. 1. (ब) चुकीच्या जोड्या :**

(1) छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस – दिल्ली

(2) नटसम्राट – विजय तेंडुलकर


(3) हिमालयीन कार रॅली – आरोग्य पर्यटन.

**प्र. 2. (अ)**

**(1)**

| विचारवंताचे नाव | ग्रंथाचे नाव |
|---|---|
| जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | रिझन इन हिस्टरी |
| लिओपॉल्ड व्हॉन रांके | द थिअरी अ‍ॅण्ड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी |
| हिरोडोटस | द हिस्टरीज |
| कार्ल मार्क्स | दास कॅपिटल |

**(2)**



(3)

| इ. स. १८७६ | इ. स. १९३२ | इ. स. १९३७ | इ. स. १९४६ |
|---|---|---|---|
| भारतवर्षीय प्राचीन ऐतिहासिक कोश | भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोश | भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश | भारतवर्षीय अर्वाचीन चरित्रकोश |

**प्र. 2. (ब)**

**(1) राष्ट्रवादी इतिहासलेखन :**

(१) एकोणिसाव्या-विसाव्या शतकात भारतात इंग्रजी शिक्षणपद्धती सुरू झाली. या पद्धतीत शिकून तयार झालेल्या इतिहासकारांना भारताच्या वैभवशाली प्राचीन इतिहासाविषयीची जाण आली. आत्मजाणीव निर्माण झालेल्या या इतिहासकारांनी भारताविषयी जे इतिहासलेखन केले, त्या लेखनास 'राष्ट्रवादी इतिहासलेखन' असे म्हणतात.

(२) या राष्ट्रवादी इतिहासलेखकांनी प्राच्यवादी लेखकांच्या पूर्वग्रहदूषित इतिहासलेखनाला विरोध केला.

(३) भारताच्या इतिहासातील सुवर्णकाळ शोधून त्यावर त्यांनी लेखन केले.

(४) राष्ट्रवादी इतिहासलेखनामुळे ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यास प्रेरणा मिळाली; तसेच प्रादेशिक इतिहास लिहिण्यालाही चालना मिळाली.

**(2) हेमाडपंती शैली :**

प्रामुख्याने बाराव्या-तेराव्या शतकात यादवकाळात महाराष्ट्रात हेमाडपंती मंदिरांची बांधणी झाली.

(१) हेमाडपंती स्थापत्यशैलीचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीत दोन दगडांमधील सांधे चुन्याने वा मातीने भरले जात नाहीत. दगडांमध्येच एकमेकांत घट्ट बसतील अशा कातलेल्या खोबणी आणि कुसू यांच्या आधाराने भिंती उभारल्या जातात.

(२) हेमाडपंती मंदिरांच्या बांधणीत प्रामुख्याने तारकाकृती बांधकाम आढळते.

(३) तारकाकृती मंदिरांच्या बाह्य भिंती अनेक कोनांमध्ये विभागलेल्या असतात.

(४) या दगडी भिंतींवरील देवतांची कोरीव शिल्पे पर्यटकांना आकर्षून घेतात. महाराष्ट्रभर अशी उभी असलेली हेमाडपंती शैलीतील मंदिरे तत्कालीन शिल्प व स्थापत्यकलेचा विकास दर्शवतात.

**(3) खेळांतून मिळणाऱ्या व्यावसायिक संधी :**

खेळांशी अनेक घटक संबंधित असतात. त्यातूनच पुढील अनेक व्यावसायिक संधी प्राप्त होतात–

(१) खेळांसंबंधी लेखन करणारे लेखक व समीक्षक.

(२) आकाशवाणी, दूरदर्शन व विविध वाहिन्यांवरून खेळांचे समालोचन करणारे समालोचक, तज्ज्ञ व त्यांना माहिती पुरवणारे साहाय्यक.

(३) खेळाडूंना शिकवणारे प्रशिक्षक, मैदान तयार करणारे तज्ज्ञ, पंच इत्यादी.

(४) खेळांचे चित्रीकरण करणारे कॅमेरामन व त्यांचे साहाय्यक आणि संगणक तज्ज्ञ. खासगी आस्थापनांमध्ये खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात येतात.

**प्र. 3.**

**(1)** (१) गोविंद सखाराम सरदेसाई यांनी मराठ्यांचा समग्र इतिहास अनेक खंडांत प्रसिद्ध केला.

(२) 'मराठी रियासत' प्रकाशित करून त्यांनी मराठी इतिहासलेखन क्षेत्रात मोठी कामगिरी केली.

(३) मराठी रियासतीप्रमाणे त्यांनी 'मुसलमानी रियासत' आणि 'ब्रिटिश रियासती' यांच्या खंडांचे लेखन केले.

(४) त्यांचे हे कार्य खूपच लोकप्रिय झाले, त्यामुळेच लोक त्यांना 'रियासतकार सरदेसाई' म्हणूनच ओळखू लागले.

**(2)** (१) इतिहास हा भूतकाळात घडून गेलेल्या घटनांशी संबंधित असतो.

(२) वर्तमानात दिसणाऱ्या मानवी जीवनाची घडण ही भूतकाळातील त्या घटनांवरच आधारलेली असते.

(३) या घटना विज्ञान-तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, सामाजिक-धार्मिक-राजकीय संघटन, कला इत्यादी क्षेत्रांमध्ये घडलेल्या असतात.

(४) या प्रत्येक क्षेत्रातील ज्ञानसाठ्याचा स्वतंत्र इतिहास असतो आणि या ज्ञानसाठ्याच्या आधारेच त्या प्रत्येक क्षेत्रातील पुढील वाटचालीची दिशा चालू असते.

म्हणूनच प्रत्येक क्षेत्रातील इतिहासाचे हे महत्त्व लक्षात घेता इतिहासाची संशोधन पद्धती अनेक विषयांच्या संशोधनात उपयुक्त ठरते.

**(3)** संत एकनाथांनी लोकशिक्षणाच्या हेतूने अनेक भारुडे लिहिली.

(१) या भारुडांच्या विषयांत विविधता आणि नाट्यात्मकता होती.

(२) विनोदाच्या माध्यमातून लोकांना शिक्षण देण्याचा, उपदेश करण्याचा हा प्रकार लोकांनाही आवडला.

(३) ही भारुडे चालींवर गायली जात असत. त्यामुळे लोकसंगीताच्या आधारे ती गायली जात असत.

(४) व्यवहारातील साध्या साध्या उदाहरणांतून आणि विनोदाच्या माध्यमातून रचलेली संत एकनाथांची ही भारुडे म्हणूनच लोकप्रिय झाली.

**(4)** (१) प्राचीन दस्तऐवज, कागदपत्रे अभिलेखागारांमध्ये ठेवण्यात येतात.

(२) या कागदपत्रांचे जतन करणे हे अभिलेखागारांचे काम असते.

(३) अभिलेखागारांमध्ये ठेवलेल्या कागदपत्रांत कोणताही बदल केला जात नाही.

(४) ही कागदपत्रे सुरक्षित ठेवणे व त्यांत कोणताही बदल न करता ती शासनाला किंवा अधिकृत व्यक्तींना हवी तेव्हा उपलब्ध करून देणे, हे अभिलेखागार व्यवस्थापनाचे काम असते. त्यामुळे अभिलेखागारात ठेवलेली कागदपत्रे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत विश्वासार्ह मानली जातात.

**प्र. 4.**

**(1)** IBC म्हणजे इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी या खासगी रेडिओ केंद्राचे ब्रिटिश सरकारने प्रथम 'इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस कंपनी (ISBS)' असे केले व नंतर 'ऑल इंडिया रेडिओ (AIR)' असे नामकरण केले.

**(2)** ख्यातनाम कवी पंडित नरेंद्र शर्मा यांच्या सूचनेवरून ऑल इंडिया रेडिओला 'आकाशवाणी' असे नाव दिले गेले.

**(3)** (१) आकाशवाणी सुरुवातीच्या काळात सरकारी उपक्रम व कार्यक्रम यांची माहिती जनतेला अधिकृतपणे देत असे.

(२) नंतरच्या काळात आकाशवाणी विविध मनोरंजनाचे आणि साहित्यिक मूल्य असलेले कार्यक्रम सादर करू लागली.

(३) समाजप्रबोधनाचे विविध कार्यक्रम आकाशवाणी सादर करीत असते. हे कार्यक्रम मुले, युवा, वृद्ध, महिला अशा विविध गटांतील लोकांसाठी तसेच शेतकरी, कामगार यांच्यासाठी सादर केले जातात.

(४) शेती, विज्ञान, अर्थकारण, संगीत, साहित्य अशा विविध क्षेत्रांतील कार्यक्रम आकाशवाणी सादर करीत असते.

**प्र. 5.**

**(1)** लिओपॉल्ड व्हॉन रांके यांनी 'द थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ हिस्टरी' व 'द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी' या ग्रंथांतून इतिहासलेखन कसे करावे, याविषयी मांडलेल्या मतांतून त्यांचा इतिहासविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. त्यांच्या मते –

(१) इतिहासलेखनात काल्पनिकता नसावी. इतिहासाचे चिकित्सक पद्धतीने संशोधन व्हावे.

(२) इतिहासलेखन करताना ऐतिहासिक घटनांशी संबंधित सर्व कागदपत्रे व दस्तऐवज यांचा कसून शोध घेणे आवश्यक आहे. या सखोल संशोधनामुळे आपल्याला ऐतिहासिक सत्यापर्यंत पोहोचता येते.

(३) जागतिक इतिहासाच्या मांडणीवर भर द्यायला हवा.

(४) एकोणिसाव्या शतकातील इतिहासलेखनाच्या पद्धतीवर रांकेच्या विचारांचा प्रभाव होता.

**(2)** इतिहासाच्या साधनांत लिखित, भौतिक आणि मौखिक साधने यांचा समावेश होतो. या साधनांचे वेगवेगळ्या पद्धतीने जतन करावे लागते. त्यासाठी माझ्या मते पुढील उपाययोजना कराव्यात–

(१) किल्ले, स्मारके, राजवाडे अशा ऐतिहासिक वास्तूंची नियमित डागडुजी केली पाहिजे. वास्तूंची नासधूस करणे, त्यावर नावे लिहिणे वा कोरणे हे टाळण्याबाबत उपाय योजावेत.

(२) ऐतिहासिक नाणी, हत्यारे इत्यादी वस्तू जपून हाताळाव्यात. त्यांची चोरी होणार नाही याची काळजी घ्यावी. ऐतिहासिक साधनांच्या जतनासाठी कडक कायदे करावेत.

(३) ओव्या, लोकगीते आदी मौखिक साहित्याचे संकलन करून ते लिखित स्वरूपात आणावे.

(४) प्राचीन ग्रंथांचे वाळवी व बुरशी यांपासून संरक्षण करावे. ओलसरपणा, दमट हवा यांमुळे बुरशी लागते. म्हणून त्यांना पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी. कीटकनाशक औषधांचा वापर करावा.

(५) या सर्व साधनांच्या जतनासाठी अनुभवी तज्ज्ञ मंडळींचे सल्ले घ्यावेत.

(६) या साधनांचे महत्त्व समाजाला पटवून देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेऊन समाजाचे प्रबोधन करावे. या साधनांविषयी, प्राचीन इतिहासाविषयी जनतेच्या मनात आपुलकी निर्माण केली पाहिजे. हा आपला प्राचीन वारसा आहे, त्याचे महत्त्व पटवून देऊन त्याविषयी त्यांच्या मनात गोडी निर्माण करावी.

(७) ऐतिहासिक साधनांच्या जतनात सामान्य जनतेला मोठ्या प्रमाणात सामील करून घ्यायला हवे. तसे उपक्रम हाती घ्यायला हवेत.

(**टीप :** *उत्तरात कोणतेही सहा उपाय लिहिणे अपेक्षित आहे.*)

**(3)** खेळांचे महत्त्व पुढील दृष्टीने अनन्यसाधारण आहे–

(१) खेळांमुळे जीवनातील व्यथा व चिंता विसरल्या जातात.

(२) माणसाच्या मनाला विरंगुळा मिळतो, त्यामुळे मन ताजेतवाने व उल्हसित होते.

(३) खेळांमुळे व्यायाम होऊन शरीर काटक व बळकट होते.

(४) खेळांमुळे मनोधैर्य वाढते. चिकाटी, खिलाडूपणा हे गुण अंगी बाणतात.

(५) सांघिक खेळातून सहकार्य व संघभावना वाढीस लागतात.

(६) खेळांमुळे नेतृत्वगुण विकसित होतात.

**(4)** पर्यटनाचे वैयक्तिक आणि देशालाही पुढील फायदे होतात –

(१) पर्यटनामुळे स्थानिक रोजगार वाढतात. नव्या बाजारपेठा निर्माण होऊन पर्यटनस्थळांचा विकास होतो.

(२) नव्या वसाहती निर्माण होतात व खेड्यांचे पुनरुज्जीवन होते.

(३) जागतिक पर्यटन वाढून देशाला परकीय चलन मिळते.

(४) हस्तोद्योग, कुटीरोद्योग वाढीस लागून लोकांचे राहणीमान सुधारते.

(५) विविध स्थळे, निसर्ग, संस्था यांना भेटी देऊन माहिती मिळते, ज्ञान मिळते, माणसे बहुश्रुत होतात.

(६) विविध प्रकारचे लोक, भिन्न भाषिक व भिन्न संस्कृतींचे लोक एकत्र येतात. त्यातून सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढीस लागते.

(७) ऐतिहासिक स्थळे पाहून आपल्या वैभवशाली इतिहासाचे दर्शन होते. चांगल्या भविष्याची प्रेरणा मिळते. पूर्वजांचा हा सांस्कृतिक वारसा व ठेवा आपण जपला पाहिजे, याची जाणीव होते.

(८) पर्यटनातून वैयक्तिक आणि सांघिक स्वरूपाचा आनंद, ज्ञान व अनुभव मिळतो.

(**टीप :** *उत्तरात कोणतेही सहा फायदे लिहिणे अपेक्षित आहे.*)

प्र. 6.

(1) ७३ व्या व ७४ व्या संविधान दुरुस्तीने स्थानिक शासनसंस्थांच्या अधिकारांत खूप मोठी वाढ झाली.

(2) बिहारमधील आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली मोठा उठाव केला होता.

प्र. 7.

**(1)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) संविधान हे प्रवाही असून ते एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

(२) संविधानात बदलत्या परिस्थितीनुसार बदल करण्याचा अधिकार संसदेला असतो.

(३) संविधानाच्या मूलभूत चौकटीला धक्का न लावता जनतेच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी संसद असे बदल करू शकते. संविधानाच्या या प्रवाही गुणधर्मामुळेच त्याचे स्वरूप एखाद्या जिवंत दस्तऐवजाप्रमाणे असते.

**(2)** हे विधान चूक आहे; कारण –

(१) भारतीय निवडणूक आयोग हा राजकीय पक्षांच्या मान्यतेचे निकष निश्चित करून त्यांना राष्ट्रीय वा प्रादेशिक पक्ष म्हणून मान्यता देत असतो.

(२) संसद आणि विधिमंडळात मिळवलेल्या जागा आणि निवडणुकीत मिळालेल्या मतांची टक्केवारी यांचा या अटीत समावेश असतो.

(३) शिरोमणी अकाली दल हा 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून निश्चित केलेल्या अटीत बसत नाही. तो पंजाब राज्यापुरता मर्यादित व प्रभावी असल्याने या पक्षाला राष्ट्रीय नव्हे; तर प्रादेशिक पक्ष म्हणून आयोगाने मान्यता दिलेली आहे.

**(3)** हे विधान बरोबर आहे; कारण –

(१) लोकशाही मजबूत बनण्यासाठी न्याय्य व खुल्या वातावरणात निवडणुका होणे आवश्यक असते.

(२) परंतु काही वेळा निवडणूक प्रक्रियेत मोठा भ्रष्टाचार होतो.

(३) बनावट मतदान होणे, मतदानासाठी पैसे वा वस्तूंचे वाटप होणे, मतदार वा मतपेट्या पळवून नेणे असे प्रकार वाढत जातात. त्यामुळे लोकांचा लोकशाही प्रक्रियेवरचा विश्वास उडू शकतो.

प्र. 8. (अ)

**(1) अन्याय – अत्याचार प्रतिबंधक कायदा :**

(१) भारतीय समाजात परंपरेने चालत आलेल्या जातिव्यवस्थेने कनिष्ठ मानल्या गेलेल्या जाती-जमातींवर खूप अन्याय झाला.

(२) स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानाने सामाजिक न्याय व समता ही उद्दिष्टे स्वीकारली. त्यासाठी अन्यायपीडित जाती-जमातींना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक होते.

(३) त्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींतील व्यक्तींवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये; यासाठी शासनाने अन्याय–अत्याचार प्रतिबंधक कायदा संमत केला.

(४) या समाज घटकांवर अत्याचार घडल्यास या कायद्याने संबंधित व्यक्तींना शिक्षेची तरतूद करण्यात आली.

या कायद्यामुळे अशा प्रकारचे अन्याय होण्याचे प्रमाण खूप कमी होऊन सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होण्यासही खूप मदत झाली.

**(2) निवडणूक आयोग :**

(१) लोकशाहीच्या यशस्वितेसाठी ठरावीक कालावधीत निवडणुकांची गरज असते. या निवडणुका खुल्या वातावरणात घेण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असली पाहिजे.


(२) या विचाराने संविधानाने कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती केली. या यंत्रणेत एक मुख्य आयुक्त व अन्य दोन निवडणूक आयुक्त असून त्यांची राष्ट्रपतींकडून नेमणूक होते.

(३) या तीनही आयुक्तांचा दर्जा व अधिकार समान असतात. निवडणुकीच्या तारखा जाहीर करण्यापासून निवडणुकांचे निकाल जाहीर करण्यापर्यंत निवडणुकीची सर्व प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली चालते.


(४) निवडणूक आयोगाकडे स्वतःचा स्वतंत्र कर्मचारीवर्ग नसतो. शासकीय अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांच्या मदतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. आयोगाच्या खर्चासाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद केलेली असते. निवडणूक आयोगाला स्वायत्तता असते.

**प्र. 8. (ब)**

**(1)**




**(2)**




**प्र. 9.**

**(1)** (१) निवडणुका जाहीर झाल्यापासून निर्णय घोषित होईपर्यंत सरकार, राजकीय पक्ष, उमेदवार व मतदार यांनी कोणत्या नियमांचे पालन करावे व कोणते वर्तन करू नये, यासंबंधीची जी नियमावली निवडणूक आयोगाकडून जाहीर केली जाते, त्या आचारनियमावलीस 'निवडणूक आचारसंहिता' असे म्हणतात.

(२) निवडणुकीच्या काळात गैरप्रकार होऊ नयेत, म्हणून आचारसंहिता घोषित केली जाते. आचारसंहितेचा भंग करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईमुळे सामान्य मतदार आश्वस्त होतो, तसेच निवडणुका खुल्या वातावरणात व निष्पक्ष पद्धतीने घेता येतात.

**(2)** राजकीय पक्षांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

(१) निवडणुकांच्या माध्यमातून सत्ता प्राप्त करणे, हे राजकीय पक्षांचे मुख्य उद्दिष्ट असते.

(२) प्रत्येक राजकीय पक्षाची विशिष्ट विचारसरणी व धोरण असते.

(३) आपल्या विचारसरणीप्रमाणे प्रत्येक पक्ष आपल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करीत असतो.

(४) निवडणुकीत बहुमत मिळवणारा पक्ष सत्ताधारी बनतो; तर अल्पमतातील पक्ष विरोधी पक्ष म्हणून कार्य करतात.

(५) राजकीय पक्ष सरकार व जनता यांच्यातील दुवा म्हणून काम करून जनमताचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करतात.

---

❀❀❀